
## We are Proud of our Alumni!!

## आम्हांला आमच्या विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे.








**Mr. Umesh K Gandhas, Completed Diploma in Mechnaical Engineering from Batch 2011-12 MET's Institute of Technology-Polytechnic, Nashik and** Junior as Currently working **Fire and Rescue officer in Airports Authority of India**) AAI(**, Ministry of** C**ivil Aviation ,Government of India**.

भारतीय विमानतळ प्राधिकरण म्हणजेच , Airport Authority of India (AAI ) ही भारत सरकारच्या Ministry of Civil Aviation च्या अधिपत्याखाली कार्य करणारी संविधानिक संस्था असून, तिचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. सद्यस्थितीत या प्राधिकरणात, तांत्रिक व अतांत्रिक श्रेणीत एकूण १७,५३५ अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. प्राधिकरणाच्या तांत्रिक विभागांतर्गत, AAI मधील वाहने व विविध यंत्रणांना सुस्थितीत ठेवणे, तसेच देशांतर्गत Civil Aviation साठी लागणारी पायाभूत सामुग्री निर्माण, वृद्धिंगत व दुरुस्त करणे ,या गॉष्टींचा समावेष AAI च्या प्रमुख कार्यात होतो. AAI अंतर्गत १२६ विमानतळ (Airports) कार्यरत असून , त्यांत ११ आंतरराष्ट्रीय , ११ कस्टम व ८९ डोमेस्टीक विमानतळांचा, तसेच सैनिकी हवाई क्षेत्रासाठी राखीव अशा २६ Civil Enclaves चा समावेश होतो. AAI मधील तांत्रिक व हवाई वाहतूक नियंत्रण विभागामध्ये ,कनिष्ठ कार्यकारी अधिकारी (Junior Executive ) या पदांसाठी खूप साऱ्या नोकरीच्या संधी मेकॅनिकल अभियंत्यासाठी प्राप्त होत असतात.

**श्री. उमेश कचरू गंधास** हा शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील, मेट पॉलीटेकनिक च्या यंत्र अभियांत्रिकी विभागातील प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थी. शैक्षणिक कारकीर्दीत अतंत्य मेहनती व अभ्यासू अशा उमेशने, त्याच्यासारखीच ग्रामीण पार्श्वभुमी असणाऱ्या इतर अनेक विद्यार्थ्यांसाठी आदर्श घालून दिलाय की ,भाषा किंवा व्यक्तिमत्वाचा कुठलाही न्यूनगंड न बाळगता ,चिकाटीने व संयमाने , आपल्या इच्छित ध्येयापर्यंत पोहचणे, सहज शक्य आहे. पुणे विद्यापीठातून BE (Mechanical) मधून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर, तो स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासासाठी दिल्लीला गेला. केन्द्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देतांना , त्यासोबतच इतरही अनेक स्पर्धा परीक्षांत तो सहभागी होत होता. अशाच प्रकारच्या, भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या, Fire Services मधील Junior Fire & Rescue Officer या Executive पदासाठीच्या स्पर्धा परीक्षेत , तो पहिल्याच प्रयत्नात यशस्वी झाला.

केंद्रीय लोकसेवा आयोगाप्रमाणेच, केंद्र स्तरावरील विविध प्रशासकीय विभागांत , वेगवेगळया Executive पदांसाठी खूप साऱ्या स्पर्धा परीक्षा सातत्याने घेतल्या जातात , ज्याची माहीती आपल्या महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांना बऱ्याचदा नसते, अथवा असल्यास त्यांकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. त्यामानाने उत्तरेकडील (उत्तरप्रदेश , बिहार , पंजाब व हरियाणा तसेच जम्मू आणि काश्मीर ) राज्यांतील विदयार्थी यांत आघाडीवर असतात , अशी खंत तो व्यक्त करतो. AAI च्या फायर सर्व्हिस व हवाई वाहतूक विभागांतील, कनिष्ठ कार्यकारी अधिकारी (Junior Executive) या पदासाठी, मेकॅनिकल व ऑटोमोबाईल शाखेतील , अभियांत्रिकी पदवी उत्तीर्ण झालेले विदयार्थी पात्र ठरतात. परीक्षेसाठीच्या निकषात, उमेदवाराकडे हलके

व जड वाहनाचे (LMV & HMV) वैध लायसन्स असणे आवश्यक असते . तसेच पुरुष उमेदवारांसाठी, उंची किमान १६७ सेंमी (अनवाणी), छाती :किमान ८१ सेंमी (प्रसरणाशिवाय) व किमान ५ सेंमी प्रसरण, वजन: किमान ५५ किग्रॅ, तसेच महिला उमेदवारांसाठी उंची किमान १५७ सेंमी (अनवाणी), वजन: किमान ४५ किग्रॅ व निर्दोष दृष्टी अशी शारीरिक पात्रता असणे आवश्यक आहे. या पदांसाठी कुठल्याही प्रकारच्या अनुभवाची अट नसून , केवळ केंद्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झाल्यास, उमेदवारास प्राधिकरणात काम करण्याची संधी प्राप्त होते.

सदर पदासाठी निवड झालेल्या पदवीधारक उमेदवारास, रु . ४००००-१४००००/-अशी वेतन श्रेणी लागू असून ,४००००/- हे बेसिक वेतन गृहीत धरल्यास व त्यांत प्राधिकरणाद्वारे लागू केलेले सर्व भत्ते पकडून रु. ७५०००/- एवढे प्राथमिक वेतन, सेवेत निवड झालेल्या उमेदवारास मिळते. उमेश सध्या,AAI च्या फायर सर्व्हिस विभागात, मुंबई येथे कनिष्ठ कार्यकारी अधिकारी (Junior Executive) म्हणून कार्यरत आहे.

उमेशने दिलेल्या माहितीनुसार , पदवी धारकांप्रमाणेच, मेकॅनिकल, ऑटोमोबाईल व प्रोडकशन इंजिनीअरिंग मधील पदविका (Diploma) प्राप्त विदयार्थ्यांना देखील, भारतीय विमानतळ प्राधिकरणा AAI मार्फत, केंद्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेद्वारे, Fire Services अंतर्गत कनिष्ठ सहाय्यक (Junior Assistant) या पदावर काम करण्याची संधी प्राप्त होते.

सदर परीक्षेसाठी लागणारा अनुभव , शैक्षणिक पात्रता व इतर आवश्यक निकष, हे वर उल्लेख केलेल्या कनिष्ठ कार्यकारी अधिकारी (Junior Executive) या पदाप्रमाणेच असून ,या पदासाठी निवड झालेल्या डिप्लोमा धारकास रु. ३१०००-९२०००/-अशी वेतन श्रेणी लागू असून, ३१०००/- हे बेसिक वेतन गृहीत धरल्यास व त्यांत प्राधिकरणाद्वारे लागू केलेले सर्व भत्ते पकडून Tier I श्रेणींमधील शहरांत, सेवेत नव्याने रुजू होणाऱ्या उमेदवाराचे एकूण वेतन, ५७०००/- एवढे असून ,सद्यस्थितीत कुठल्याही शासकीय वा खाजगी सेवेतील प्राथमिक स्तरावर, इतर पदविकाधारकांना मिळणाऱ्या वेतनापेक्षा ते सर्वाधिक वेतन असल्याचं तो नमूद करतो.

डॉ. ए पी जे अब्दुल कलाम, कल्पना चावला, सूनिता विलियम्स यांसारख्या अंतराळ व हवाई क्षेत्रांतील प्रख्यात व्यक्तिमत्वांमुळे, भारतीय विद्यार्थ्यांनादेखील अवकाश संशोधन तसेच एरोनॉटिकल इंजिनीरिंग विषयांत रुची व जागृती निर्माण झाली असून, त्यांत करियर करण्याचं स्वप्न देखील अनेक शाळकरी विदयार्थी पाहत असतात. परंतु सर्वांनाच हे शिव धनुष्य पेलणं अनेक कारणांमुळे शक्य होऊ शकत नाही. त्यामुळेच १० वी , १२ वी तसेच मेकॅनिकल अभियांत्रिकीतील पदविका व पदवी धारक विदयार्थ्यांना देखील,एरोनॉटिक्स क्षेत्रांत, AAI मार्फत उपलब्ध विविध पर्याय -संधींची ओळख मेट पॉलीटेकनिक च्या , यंत्र विभागाचा माजी विदयार्थी उमेश, याच्या स्वानुभवातून करून देण्याचा हा एक छोटासा प्रयत्न .

एकूणच उमेशच्या या सकारात्मक वाटचालीकडे पाहताना , मला भारतरत्न स्व. बाबा आमटे यांनी युवकांसाठीच लिहिलेल्या "ज्वाला आणि फुले " या पुस्तकामधील प्रास्ताविकात थोडासा बदल करून म्हणावेसे वाटते,

> “झेपावणाऱ्या या पंखांना क्षितिजे नसतात ,
> त्यांना फक्त झेपेच्या कवेत येणारे,
> आकाश असते.... उद्याच्या उड्डाणाचे.... "

हे आकाश पाहायचे असेल तर , या विदयार्थ्यांनी उमेश प्रमाणेच सकारात्मकतेने,नवीन संधींचा शोध घेवून, कष्ट उपसून, त्यानंतर आयुष्यात होणाऱ्या सुंदर परिवर्तनासाठी तयार राहिलं पाहीजे, याच शुभेच्छांसह ...

**अमोल पुरुषोत्तम वडनेरे,**
विभाग प्रमुख- यंत्र अभियांत्रिकी विभाग,
मेट पॉलीटेकनिक- भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक.